Dr. Babasaheb Ambedkar
Marathwada University
Chhatrapati Sambhajinagar-431004
Maharashtra (India)
NAAC Re-accredited 'A' Grade

Telephone
Office PBX : (0240) 2403399/400
C.O.E. : (0240) 2403200
Fax : (0240) 2403199/188
Website : www.bamu.ac.in
http://bamua.digitaluniversity.ac
E-Mail : coe@bamu.ac.in

डॉ. बाबासाहेब आंबेडकर
मराठवाडा विद्यापीठ
छत्रपती संभाजीनगर-४३१००४. महाराष्ट्र (भारत)
नॅक समितीतर्फे 'अ' दर्जा प्राप्त

Office : Director, Board of Examinations & Evaluation

कार्यालय : संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ

संदर्भ : परीक्षा/समन्वय/२०२४-२५/ 210 दिनांक : २२.०७.२०२४

**अत्यंत तात्काळ**

**प्रति,**

**१. प्राचार्य/संचालक**
**सर्व संलग्नित महाविद्यालय/परिसंस्था,**
**डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,**
**छत्रपती संभाजीनगर**

**२. विभाग प्रमुख/संचालक,**
**सर्व शैक्षणिक विभाग,**
**डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,**
**छत्रपती संभाजीनगर व उप-परिसर धाराशिव.**

**विषय : सर्व पदवी, पदविका व पदव्युत्तर अभ्यासक्रमांचे परीक्षा आवेदन पत्र व परीक्षा शुल्क प्रवेश अर्जासोबत स्विकारणेबाबत**

**संदर्भ :** १. दि. १०.०७.२०२४ रोजी झालेल्या मा. परीक्षा व मूल्यमापन मंडळ बैठकीतील निर्णय.
२. दि. २०.०७.२०२४ रोजी प्रसिध्द करण्यात आलेले निर्धारित वेळापत्रक २०२४-२५

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयी व संदर्भिय पत्राच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, मा. परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या दि. १०.०७.२०२४ रोजी झालेल्या बैठकीत शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासुन सर्व पदवी, पदविका व पदव्युत्तर अभ्यासक्रमांचे परीक्षा आवेदन पत्र व परीक्षा शुल्क हे प्रवेश अर्जासोबत घेण्याबाबत ठराव पारित करण्यात आलेला आहे.

त्यानुसार सर्व प्रथम, तृतीय, पाचवे, सातव्या व नवव्या सत्राच्या विद्यार्थ्यांचे (Regular Students only) परीक्षा आवेदन पत्र व परीक्षा शुल्क हे प्रवेश अर्जासोबत स्विकारण्यात यावे.

सर्व व्दितीय, चतुर्थ, सहावे, आठव्या व दहाव्या सत्राच्या विद्यार्थ्यांचे (Regular Students only) परीक्षा आवेदन पत्र व परीक्षा शुल्क हे हिवाळी सत्राच्या (End Exam of the October/November Session) परीक्षा संपल्यानंतर लगेच भरुन घेण्यात यावे.

कृ.मा.पहा

सर्व पात्र विद्यार्थ्यांच्या ७५ टक्के उपस्थितीबाबतची पडताळणी विभाग प्रमुख/प्राचार्य/संचालक यांनी करुन विद्यार्थ्यांस परीक्षेचे प्रवेश पत्र निर्गमित करावे. याबाबतची सर्व जबाबदारी विभाग प्रमुख/प्राचार्य/संचालक यांची राहील.

तसेच ज्या तारखेला परीक्षा आवेदन पत्र जनरेट होतील त्या तारखेपासुन पुढील (०५) दिवसांच्या आत परीक्षा आवेदन पत्र व परीक्षा शुल्क भरुन घेण्याबाबतची कार्यवाही करण्यात यावी. त्यानंतर सादर होणाऱ्या परीक्षा आवेदनप पत्रास नियमप्रमाणे विलंब व अति विलंब शुल्क आकारण्यात येईल.

करिता, सर्व संबधितांनी उपरोक्त प्रमाणे नोंद घेऊन सर्व संबधित विद्यार्थ्यांचे परीक्षा आवेदन पत्र व परीक्षा शुल्क भरुन घेण्याबाबत कार्यवाही करावी. ही विनंती.

हे पत्र प्रस्तुत विद्यापीठाच्या http://bamua.digitaluniversity.ac या संकेतस्थळावर Circular या सदराखाली प्रसिद्ध करण्यात आले आहे.

Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University, Chhatrapati Sambhajinagar

**संचालक**
**परीक्षा व मुल्यामापन मंडळ**

**या पत्राची प्रत :**

१. मा. कुलगुरु महोदयांचे स्वीय सहाय्यक, प्रस्तुत विद्यापीठ यांना माहितीस्तव अग्रेषित.
२. मा. प्र-कुलगुरु महोदयांचे स्वीय सहाय्यक, प्रस्तुत विद्यापीठ यांना माहितीस्तव अग्रेषित.
३. संचालक, उप-परिसर धाराशिव, प्रस्तुत विद्यापीठ यांना माहितीस्तव अग्रेषित.
४. उपकुलसचिव, पदव्युत्तर विभाग, प्रस्तुत विद्यापीठ यांना माहितीस्तव अग्रेषित.
५. उपकुलसचिव, शैक्षणिक विभाग, प्रस्तुत विद्यापीठ यांना माहितीस्तव अग्रेषित.
६. पदव्युत्तर विभाग, प्रस्तुत विद्यापीठ यांना माहितीस्तव तथा पुढील कार्यवाहीस्तव अग्रेषित.
७. नोडल ऑफिसर, एम.के.सी.एल, यांना माहितीस्तव तथा पुढील कार्यवाहीस्तव अग्रेषित.
८. समन्वयक, ई-सुविधा, यांना माहितीस्तव तथा पुढील कार्यवाहीस्तव अग्रेषित.
९. संचालक, युनिक विभाग, प्रस्तुत विद्यापीठ यांना माहितीस्तव अग्रषित.
१०. सर्व कक्ष प्रमुख, संबधित कक्ष, परीक्षा व मूल्यमापन विभाग, प्रस्तुत विद्यापीठ यांना देऊन संबंधितांस उपरोक्त प्रमाणे नोंद घेऊन कार्यवाही करण्यात यावी.